महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२१-२२/२०२२/306 दिनांक : १७.०१.२०२३

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : महाडीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांच्या प्रलंबित असलेल्या (विद्यार्थी/संस्था/विभागीय कार्यालय स्तरांवर) अर्जावरील कार्यवाहीबाबत..

संदर्भ : या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक तंशिविकापु/विवि/महाडीबीटी २०२१-२२/२०२२/४३११ दिनांक २१.०९.२०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन, **"राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरावडा"** (दि. १७.०९.२०२२ ते ०२.१०.२००) अंतर्गत डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांच्या प्रलंबित असलेल्या अर्जावरील कार्यवाही बाबत संदर्भिय परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले होते.

महाडीबीटी पोर्टलवरील डॅशबोर्डमध्ये, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ मधील काही विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज अद्यापही संस्था स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित (Pending at Institute) दिसून येत आहेत. याकारणास्तव विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरता येत नाहीत व असे विद्यार्थी या विभागीय कार्यालयाकडे विचारणा करीत आहेत.

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त येणा-या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, खाजगी विनाअनुदानित संस्थांना सूचित करण्यात येते की, संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज (Sent Back अंतर्गत), संस्था स्तरावर तपासणीसाठी (Pending at Institute अंतर्गत) योग्य कार्यवाही करुन **दिनांक २०.०१.२०२३ पर्यंत** निकाली काढावेत. **जर सदर अर्ज प्रलंबित राहिल्यास व त्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.**

तसेच शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील संचालनालयाच्या शिष्यवृत्ती योजनांसाठी अद्यापही ब-याच विद्यार्थ्यांनी अर्ज केल्याचे दिसून येत नाही. तरी संस्थांनी याबाबत सर्व पात्र विद्यार्थ्यांना सूचित करुन अंतिम मुदतीच्या आत महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज करण्यास अवगत करावे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :

१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्र. १८) यांना माहितीस्तव.
२) प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शीत करणेसाठी.